




Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे | अंक : ७२९ . वा | शुक्रवार दि. ०५ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# प्रतापरावांना पाडण्यासाठी आमदार गायकवाड यांचा खरंच कोणता प्लान-२ आहे का?

## विजयराज शिंदे यांच्या दाव्यात तथ्य किती, राजकीय जाणकारही संभ्रमात



**जनसंचलन/बुलढाणा**

होळीचा सण नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. परंतु राजकीय पटलावर अजूनही मोठ्या प्रमाणात धुळवड सुरूच आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये एकमेकांवर आरोपांच्या पिचकारीतून शब्दांचे रंग उडवण्याचे काम सुरूच आहे. काही दिवसांपूर्वी आमदार संजय गायकवाड यांनी माजी आमदार तथा भाजपचे लोकसभा प्रभारी विजयराज शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता, तर त्याला विजयराज शिंदे यांनी सडेतोर उत्तर देत संजय गायकवाड यांचा प्रतापरावांना पाडण्याचा हा प्लान-२फआहे असे म्हटले होते. परंतु आता सध्या यावर मोठी चर्चा रंगल्याचे पहायला मिळते आहे. असा खरंच कोणता प्लान-२ आहे का, यावर राजकीय जाणकारही संभ्रमात पडले आहेत. भाजप कार्यकर्त्यांची प्रतापरावांच्या विरोधात तीव्र भावना असून देखील शिंदे गटाच्या वतीने पुन्हा एकदा प्रतापरावांच्या गळ्यात लोकसभा उमेदवारीची माळ टाकण्यात आली आहे. या घटनेमुळे निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. अनेक भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते प्रतापराव जाधव यांचे काम करण्याच्या अजिबात मूडमध्ये नाहीत. नाही म्हणायला प्रतापराव जाधव यांच्या अर्ज भरते वेळी भाजपचे काही वरिष्ठ नेते व लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष हजर होते. परंतु भाजपचे लोकसभा प्रभारी विजयराज शिंदे यांची अनुपस्थिती तेथे असलेल्या अनेकांना खटकली. जेंव्हापासून लोकसभेची रणधुमाळी सुरू झाली आहे, तेंव्हापासून खासदार प्रतापराव जाधव आमदार संजय गायकवाड यांच्याकडून सातत्याने विजयराज शिंदे व भाजपच्या काही वरिष्ठ नेत्यांना सातत्याने डावलण्यात येत आहे. प्रतापरावांच्या प्रचारासाठी आयोजित मेळाव्यातून हे स्पष्ट झाले आहे. ही घटना घडायला इतिहासाचे बरेचसे संदर्भ आहेत. आमदार विजयराज शिंदे आणि प्रतापराव व संजय गायकवाड यांच्यातून विस्तवही जात नाही. त्यामुळेच २०१९ साली प्रतापरावांनी विजयराज शिंदे यांचे तिकीट कापले आणि ठिणगीतून सुरू झालेल्या वादाने वणव्याचे स्वरूप घेतले. पुढे विजयराज यांचा शिवसेना टू भाजपा व्हाया वंचित असा राजकीय प्रवास घडला. आज विजयराज शिंदे यांचे भाजपात चांगलेच वजन आहे. असे असतानाही मित्रपक्षाच्या या वरिष्ठ व वजनदार नेत्याला डावलण्याचा नतद्रष्टपणा प्रतापराव व संजय गायकवाड यांच्याकडून का झाला, याचे उत्तर ते स्वतःच देऊ शकतात. भाजप कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता काही दिवसांपूर्वी विजयराज शिंदे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या प्रकारामुळे तर प्रतापराव-संजय गायकवाड गटात आणखीनच रोष उफाळून आला. एकीकडे राजकीय वादाचा हा होमकुंड धगधगत असताना या होमकुंडाच्या आगीत तेल ओतण्याचे काम मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. त्यांनी तर थेट आपल्या मित्रपक्षाच्या एव्हढ्या जबाबदार नेत्याची मऔकातफ्व काढली. याचा अर्थ जिल्ह्यात भाजप-शिवसेनेत निर्माण झालेली दरी आणखी रुंदावत चालल्याचे दिसत आहे. यादरम्यान एका पत्रकार परिषदेत भाजपा नेते विजयराज शिंदे यांनी जे वक्तव्य केले, त्याची चर्चाही रंगू लागली आहे. पत्रकारांशी बोलताना विजयराज शिंदे यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला की, आमदार संजय गायकवाड यांनी तुम्हाला आव्हान दिले आहे की, तुम्ही आपला उमेदवारी अर्ज हा कायम ठेवला पाहिजे. अर्ज मागे घेऊ नये. यावर बोलताना विजयराज शिंदे म्हणाले की, संजय गायकवाड ही मागणी यासाठी करीत आहेत की तो संजय गायकवाड यांचा प्रतापरावांना पाडण्यासाठी प्लान-२ आहे. यातून विजयराज शिंदे यांना हेच सूचित करायचे आहे की, विजयराज शिंदे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवावा, म्हणजे भारतीय जनता पक्ष त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करेल, तर दुसरीकडे मतविभाजनामुळे प्रतापरावांचा पराभव देखील होऊ शकतो. आमदार गायकवाड हे एकप्रकारे विजयराज शिंदे यांना उमेदवारी अर्ज कायम ठेवण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत, जेणेकरून प्रतापराव जाधव हे निवडणुकी पडले पाहिजे ज्यामुळे पुढच्या निवडणुकीत संजय गायकवाड यांचा दावा मजबूत होऊ शकेल. आता विजयराज शिंदे यांनी केलेले हे वक्तव्य साधे-सुधे आहे की, त्याला खरंच काही राजकीय कंगोरे आहेत. राजकारणामध्ये आपल्या वरिष्ठ नेत्यास आपल्या रस्त्यातून बाजूला करणे, ही एक सर्वसाधारण बाब आहे. प्रतापराव यांच्या खासदारकीवर आमदार गायकवाड यांची नजर नसेलच, असे समजणे हे बालबुद्धीचे ठरू शकते. एकदा प्रतापराव पडले की, त्यांचा दावा साहजिकच या मतदारसंघावरून संपून जाईल व पुढे आपला रस्ता मोकळा होईल, असा विचार गायकवाड करीत असावे, असेच या माध्यमातून विजयराज शिंदे यांना सुचवायचे आहे. आता विजयराज शिंदे हे आपले वाक्य सहज बोलून गेले की, त्यांच्या वाक्यात काही तथ्य आहे, हे कदाचित कधी बाहेर येईल की नाही सांगता येत नाही. परंतु विजयराज शिंदे हे देखील मुरब्बी राजकारणी आहेत. आमदार गायकवाड यांचे राजकारण त्यांनी खूप जवळून अनुभवले आहे. त्यामुळे हे अनुभवाचे बोल असण्याचीही शक्यता आहे. काहीही असले तरी विजयराज शिंदे यांच्या वाक्याने राजकीय भाष्यकारांना मात्र आपले डोके खाजवण्यास मजबूर केले, हे मात्र नक्की.

# अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; १ ठार, ३ गंभीर जखमी...

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

येथील चार युवक मोटारसायकलने छत्रपती संभाजीनगर येथून येताना देऊळगाव राजा नजीक एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला तर तिघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृतक युवकाचे नाव योगेश उत्तम जाधव वय २७ रा. साखरखेर्डा असे आह. उपरोक्त घटना ३ एप्रिल रोजी रात्री घडली. साखरखेर्डा येथील प्रताप विष्णू कोरडे, गणेश नामदेव धनवटे, योगेश उत्तम जाधव हे तिघे चार दिवसांपूर्वी साखरखेर्डा येथून छत्रपती संभाजीनगर येथे गेले होते. काल ३ एप्रिल रोजी सायंकाळी तेथून परत निघाले असता सोबत सोबत घेऊन निघाले. एकाच मोटारसायकलवर चौघे येत असताना एका अज्ञात वाहनाची त्यांच्या मोटारसायकलला पाठीमागून येणाऱ्या वाहनाने जबर धडक दिली या अपघातात साखरखेर्डा येथील योगेश उत्तम जाधव हा युवक जागीच ठार झाला. तर विशाल काळे, प्रताप कोरडे, गणेश धनवटे, हे तिघे गंभीर जखमी झाले त्यांना तातडीने संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे. मोटारसायकलची समोरासमोर धडक एक गंभीर जखमी कर्मचारी २ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता कमलेश गाडेकर हा आपले काम आटोपून मलकापूर पांग्रा, शेंदुर्जन येथून साखरखेर्डा मार्गे चिखलीकडे निघाला होता. गोरेगाव पाटीजवळ येताच साखरखेर्डा येथून वडगावमाळी कडे जाणाऱ्या मोटारसायकलने त्यांना जबर धडक दिली. वडगाव माळी येथील रोही नामक इसम मोटारसायकलवर पाईप घेऊन चालला होता. तो पाईप डोक्याला लागल्याने कमलेश गाडेकर हा रस्त्यावर पडला या अपघाताची माहिती येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांनी तातडीने साखरखेर्डा पोलीस स्टेशनला दिली. बीट जमादार रामदास वैराळ हे घटणास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने कमलेश यास चिखली येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

# मतदार जागृती रॅलीने दुमदुमला जिल्हा

## मतदान करून लोकशाहीचा उत्सव साजरा करा

जनसंचलन/बुलढाणा

वैश्विक ओळख असलेल्या भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात निवडणूक प्रक्रिया व मतदानाच्या अधिकाराचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता २०१९ च्या लोकसभा निवडणूकीच्या तुलनेत २६ एप्रिल रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील मतांचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून व्यापक प्रयत्न केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण आणि शहरी भागात निघालेल्या मतदार जागृती रॅलीने जिल्हा दुमदुमला आहे. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनातर्फे युवक, नवमतदार, महिला, दिव्यांग, जेष्ठ नागरिक आणि सर्वसाधारण मतदार यांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.



याचाच एक भाग म्हणून प्रत्येक कुटुंबापर्यंत मतदानाचा संदेश पोहचविण्यासाठी व मतदार जाणीव जागृतीच्या उद्देशाने जिल्हाभरात सर्वदूर शालेय विद्यार्थी, शिक्षक व नागरिक यांच्या सहभागाने मतदार जागृती रॅलींचे विविध ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत जिल्ह्याचा मतांचा टक्का वाढविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी प्रत्येक मतदारापर्यंत पोहचण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. यामध्ये प्रामुख्याने जिल्ह्यातील सुमारे १८ हजार नवमतदार, सोळा हजार दिव्यांग मतदार, ३० हजार ज्येष्ठ मतदार इत्यादीसह संपूर्ण मतदारांना दृष्टीक्षेपात ठेऊन मतदार जाणीव जागृतीसाठी व्यापक प्रयत्न केल्या जात आहेत. यापार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी बी. एम. मोहन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील १३ तालुक्यात सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रमासाठी पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांना तालुका नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. प्रत्येक मताचे मुल्य लोकशाही महत्वपूर्ण असून प्रत्येक सुजाण नागरिकाने आपला मताधिकार बजावून हा लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. मतदार जनजागृती रॅलीसोबतच इतर वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन प्रशासनातर्फे केले जात आहे.

## चिखली पोलिसांनी लावला २ लाख १६ हजार रुपयांच्या मोबाइलचा शोध १८ नागरिकांना दिलासा

जनसंचलन/ चिखली

पोलिस स्टेशन हद्दीत गहाळ झालेल्या सुमारे २ लाख १६ हजार रुपये किमतीच्या १८ मोबाइलचा शोध घेऊन चिखली पोलिसांनी ते मूळ मालकांना परत दिले आहेत. चिखली पोलिसांत मोबाइल गहाळ झाल्याबाबत दाखल तक्रार अर्जावरून बुलढाणा सायबर पोलिसांच्या मदतीने व आयएमईआय नंबरवरून संबंधित मोबाइलचा शोध घेऊन १८ मोबाइल हस्तगत केले होते. विविध कंपन्यांच्या या मोबाइल फोन्सची एकूण किंमत सुमारे २ लाख १६ हजार एवढी आहे. दरम्यान, हस्तगत केलेले मोबाइल नागरिकांना परत दिल्याने अनेकांना दिलासा मिळाला आहे. ही कामगिरी जिल्हा पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात व ठाणेदार संग्राम पाटील यांच्या नेतृत्वात डी. बी. पथकाचे पोलिस उपनिरीक्षक नितीनसिंह चौहान, महिला पोलिस कॉन्स्टेबल रुपाली उगले, पंढरीनाथ मिसाळ, माया सोनुने, अमोल गवई, राजेश मापारी, रोहिदास पंढरे, प्रशांत धंदर, नीलेश सावळे, सागर कोल्हे, राहुल पायघन तसेच तांत्रिक विश्लेषण विभागाचे सहायक पोलिस निरीक्षक विलासकुमार सानप यांनी केली आहे. दरम्यान चोरीला गेलेला मोबाईल सापडल्याची उद-हरणे कमी आहेत. परंतू चिखली पोलिसांनी ते परत मिळविले आहेत.

## चोरट्या महिलेस लेडी कॉन्स्टेबलने पकडले

जनसंचलन/ खामगाव

येथील बस स्थानकावर चोऱ्यांचे प्रकार सुरूच असून ३ एप्रिल रोजी सकाळी बसमध्ये चढतांना एका महिलेच्या पर्समधून पाकीट लंपास करणाऱ्या चोरट्या महिलेस तेथे कर्तव्यावर असणाऱ्या लेडी कॉन्स्टेबल दिव्या काळे यांनी पकडून जेरबंद केले आहे. शहरा लागत असलेल्या सुटाळा बु. येथील गौरा नगर भागातील रहिवासी सौ. गीता अनंत शेगोकार वय ५८ ह्या बाहेरगावी जाण्यासाठी सकाळी खामगाव बस स्थानकावर आल्या होत्या. यावेळी बसमध्ये चढत असताना त्यांच्या पर्समधून एका चोरट्या महिले-ने एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड व नगदी ३८०० रू. असलेले पाकीट अलगदपणे लंपास केले. काही वेळात ही घटना सौ. शेगोकार यांच्या निदर्शनास आली. त्यामुळे त्यांनी संशय आल्याने आरडा-ओरड केली असता चोरटी महिला सोनी मंगेश भोसले वय ४० रा. राहटगाव जी. संभाजीनगर ही पळून जात असताना त्या ठिकाणी कर्तव्यावर असणाऱ्या लेडी कॉन्स्टेबल दिव्या काळे यांनी धावपळ करत नागरिकांच्या मदतीने सदर चोरट्या महिलेस पकडून तिच्या जवळून चोरी केलेले पाकीट हस्तगत केले. याप्रकरणी सौ. गीता शेगोकर यांच्या तक्रारीवरून शहर पोलीस स्टेशनला चोरटी महिला सोनी मंगेश भोसले हिच्या विरुध्द कलम ३९२ भादंविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# सासरच्या मंडळीकडून विवाहितेचा छळ व मारहाण; गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

स्थानिक बोबडे कॉलनी येथे माहेरी असलेल्या सौ. योगिता श्रीकृष्ण पखाले (२९) यांचा विवाह श्रीकृष्ण रामदास पखाले (३३) रा. बोर्डी ता. अकोट, जि. अकोला, ह. मु. अमरावती यांचेसोबत झाला आहे. लमानंतर सौ. योगिता पखालेह्या गरोदर झाल्या असतांना पती श्रीकृष्ण पखाले याने मुलगा आहे किंवा मुलगी याचे निदान करून मुलगी असल्यास गर्भपात करण्यासाठी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला तसेच मारहाण करीत होता. तर सासरा रामदास सुर्यभान पखाले, सासू शालीनी रामदास पखाले, दिर विष्णू रामदास पखाले, दिराणी रचना विष्णु पखाले सर्व रा. नागास्वामी मंदिरासमोर, बोर्डी ता. अकोट, नणंद शितल गणेश ठोंबरे, नंदई गणेश ओंकार



ठोंबरे दोघे रा. शासकीय निवासस्थान लेडीहार्डींग हॉस्पीटलसमोर अकोला हे सुध्दा मुलगाअसल्यास ठेव नाही तर गर्भपात कर यासाठी शारिरीक व मानसिक छळ करीत होते. तसेच आरोपी क्र. १ ते ३ हे लग्नामध्ये सोन्याची चैन दिली नाही म्हणून चैनची मागणी करीत होते. तर पती श्रीकृष्ण पखाले फिर्यादी घटस्फोट देत नसल्यामुळे त्यांच्या रूमवर गेला होता व घटस्फोट देत नसल्यामुळे अश्लिल शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. या घटना २६ डिसेंबर २०२१ ते १७ जानेवारी २४ दरम्यान नागास्वामी मंदिरासमोर, बोडी, ता. अकोट जि. अकोला येथे घडल्या आहेत. या प्रकरणी सौ. योगिता पखाले यांनी शहर पोलिस स्टेशनला २ एप्रिल रोजी फिर्याद दिली. फिर्यादीवरून पो स्टे मध्ये उपरोक्त आरोपीविरुद्ध भादवी कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६,३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे

## दुचाकीस धडक,महिला जखमी

जनसंचलन/ देऊळगावराजा




चिखली जालना रोडवरील आमना नदीवरील पुलाज-वळ एका दुचाकीस दुसऱ्या दुचाकीने धडक दिल्याने महिला जखमी झाली ही घटना ३ एप्रिल रोजी घडली याप्रकरणी दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे शहरातील धर्मराज अभिमन्यू हनुमंते यांचा मित्र किरण सिसोदे हे दुचाकी क्र. एमएच २८ बी ८२४६ ने पत्नी समवेत ३ एप्रिल रोजी चिखली वरून शहरातील आमना नदी पुलावरून जात होते त्याचवेळी आरोपी सुभाष भानुदास घुगे साठेगाव यांनी त्यांच्या दुचाकी एमएस २१ बीबी ६३९२ ने किरण सिसोदे यांच्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली त्यामुळे दुचाकी वर असलेल्या त्यांच्या पत्नीला दुखापत झाली. याप्रकरणी पोलिसांनी आर-ोपी स्वराविरुद्ध गुन्हा दाखल केला.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पातळ गंगा नदीवरील मृदा जलसंधारण सिमेंट बंधाऱ्यांच्या कामाची निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्याची मागणी

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

किनगांव राजा येथील पातळगंगा नदी-वर मृद व जलसंधारण विभागाकडुन द्वारयुक्त सिमेंट बंधारा तयार काम सद्या सुरू आहे.परंतु या कामामध्ये निकृष्ट दर्जाची माती मिश्रीत रेती, गिट्टी, लोखंड यासह इतर वापरले जात असल्याची तक्रार इसाक कुरेशी यांनी उपविभागीय अधिकारी मृद व जलसंधारण उपविभाग देऊळगांव राजा यांच्याकडे केली आहे. तक्रारीमध्ये म्हटले आहे की,संबंधित ठेकेदाराकडून सुरू असलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे शासनाने ठरवून दिलेल्या नियमाची पायमल्ली करून काम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. पातळगंगा नदीच्या परीसरातील शेतकऱ्याना सिंचनाची सोय उप-लब्ध होण्यासाठी गट क्रमांक ७९२ मध्ये मागील काही महिन्यांपासून पातळगंगा नदीवर द्वारयुक्त सिमेंट बंधाऱ्यांचे काम सुरू आहे.या बंधाऱ्यासाठी माती मिश्रित रेतीचा वापर करण्यात येत आहे, तसेच फक्त दिसण्यासाठी लोखंडाचा वापर केला जात आहे. कामासाठी ४० व २० एमएम गिट्टीचा वापर करणे आवश्यक असताना संबंधित ठेकेदाराकडून फक्त दिसण्यासाठी बारीक गिट्टीचा वापर होत असल्याचे दिसुन येते.द्वारयुक्त सिमेंट बंधाऱ्यांमध्ये सळईचा वापर आवश्यक असतांना संबंधित ठेकेदाराकडुन कमी प्रमाणात सळई वापरण्यात येत आहे. त्यामुळे पातळगंगा नदीला पावसाळ्यामध्ये



मोठ्याप्रमाणात पुरांचे पाणी आले तर सध्या काम सुरू असलेला द्वारयुक्त सिमेंट बंधारा वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे बंधाऱ्याचे हे दर्जेदार करण्याची मागणी मृद व जलसंधारण विभागाकडे करण्यात आली आहे तसेच संबंधीत ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी निवेदनामध्ये करण्यात आली आहे.

# निवडणूक निरीक्षकांकडून कामकाजाचा आढावा

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निरीक्षकांचे जिल्ह्यात आगमन झाले असून कामकाजाला सुरवात झाली आहे. आज तिनही निवडणूक निरीक्षकांनी विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाचा आढावा घेतला. सामान्य निरीक्षक पी. जे. भागदेव यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व नोडल अधिकारी यांच्या समवेत आढावा घेतला. त्यांनी निवडणुकीसाठी आवश्यक असणारे साहित्य, वाहतूक व्यवस्था, वाहनांची उपलब्धता यांची माहिती घेत-ली. निवडणूक कामकाजाशी निगडीत निविदा झाल्या आहेत. त्यांच्यासोबत करारही झाले आहेत. त्यांच्याकडून आवश्यक असलेल्या सुविधा गरजेनुरूप प्राप्त करून घ्याव्यात. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने फिरते पथक, स्थिर तपासणी पथक, व्हीडीओग्राफी पथक पुरेसे आहेत. त्यांच्याकडून प्रभावीपणे काम करून घेण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. निवडणूक कायदा व सुव्यवस्थेसाठी नियुक्त निरीक्षक सेंथिल कृष्णण यांनी आज सुरवातीला माध्यम कक्षाला भेट दिली. कक्षातर्फे करण्यात येणाऱ्या कामकाजाची माहिती घेतली. टिव्ही, वृत्तपत्र आणि समाजमाध्यमांवरील निवडणूक विषयक प्रसिद्धीवर बारकाने लक्ष्य ठेवावे. प्रामुख्याने पोर्टलवरील बातम्या या वेगाने वितरीत होत असल्यामुळे याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना केल्या. त्यानंतर नियंत्रण कक्षातील सी-व्हीजील ॲपवरील तक्रारीबाबत माहिती घेतली. तसेच पथकांचे लोकेशन बाबत माहिती घेतली. त्यानंतर निवडणूक कक्षाला माहिती घेऊन १९५० या हेल्पलाईनची माहिती घेतली. निवडणूक खर्च निरीक्षक यांनी विविध यंत्रणांशी संपर्क साधून खर्चविषयक आढावा घेतला.

# लोकसभा निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात दाखल...

## तक्रारी,सूचनांसाठी संपर्क करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

लोकसभा निवडणूकीसाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने तिनही निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात दाखल झाले आहेत. बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी सामान्य निरीक्षक म्हणून पी. जे. भागदेव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या संपर्क क्रमांक ९९७८४०७९५० असून सर्कीट हाऊसमधील जिजाऊ कक्षामध्ये त्यांचे वास्तव्य आहे. निवडणूक कायदा व सुव्यवस्थेसाठी निरीक्षक म्हणून सेंथिल कृष्णन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ९४११११२७९२, ९६३९१४६०६६ असून सर्कीट हाऊस मधील अजिंठा कक्षात त्यांचे वास्तव्य आहे. निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून अमित शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ८८११००७८७२ असा आहे. त्यांचे वास्तव हे सर्कीट हाऊसमधील सावित्री कक्षात आहे. निवडणूक विषयक तक्रारी किंवा समस्यांबाबत तिनही निरीक्षकांकडे म्हणणे मांडता येणार आहे. नागरिकांनी त्यांच्या निवडणूक विषयक तक्रारी किंवा सूचना असल्यास निरीक्षकांकडे नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# क्षुल्लक कारणावरुन केली मारहाण

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

मुलासोबत आणित्याच्या वाहनावरील चालका सोबत झालेल्या वादावरून लोखंडी गजाने फिर्यादीच्या मुलास डोक्यात मारूनगंभीर जखमी केले या प्रकरणी एका महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. सदर मारहाणीची घटना शहरातील दुर्गापुरा येथे घडला. याबाबत पोलीस सूत्रांकडून माहितीनुसार फिर्यादी महिलेचा मुलगा वत्याच्या वाहनावरील ड्रायव्हर सोबतझालेल्या वादावरून यातील आरोपीक्रमांक १ याने लोखंडी गजाने फिर्यादी मयूर बोबडे पाठीवर मारहाण करुन जखमी केले. फिर्यादीचा मुलगा डोके फुटून तोआर-ोपी क्रमांक दोन याने लोखंडी गजाने रक्तबभबाळ झाला. भांडणाचा आरडाओरड ऐकून फिर्यादी व त्यांची सून वाद सोडविण्यासाठी गेले असता त्यांना सुद्धा आरोपी त्यांनी चापटा बुक्क्यांनी मारहाण केली व फिर्यादीचे सुन कमल बोबडे हिला मारहाण करूनजखमी केले. तसेच शिवीगाळ करूनजिवे मारण्याची धमकी दिली. छायाबाळकृष्ण बोबडे वय ६५ रा. दुर्गापुरा, दुर्गा पुरायांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी शुभमगोविंद झोरे, अमोल गोविंद झोरे वसुशीला गोविंद झोरे तिघे राहणारदुर्गापुरा यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. पोलीस हेडकॉन्स्टेबल सानप तपास करीत आहे.

# अल्पवयीन विद्यार्थिनींचा नराधम शिक्षक याने केला लैंगिक छळ

## आरोपी शिक्षकांविरूध्द गुन्हा दाखल मात्र शिक्षक फरार

**जनसंचलन/मोताळा**

चौथ्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दोन अल्पवयीन मुलींचा एका शिक्षकाने लैंगिक छळ केल्याची संतापजनक घटना ३ एप्रिल रोजी मोताळा परिसरात समोर आली आहे. या प्रकरणी तक्रारीवरून शिक्षकाविरोधात बोराखेडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोराखेडी पोलिसात या प्रकरणी एकाने तक्रार दिली आहे. त्याची मुलगी व अन्य एक मुलगी मोताळा परिसरातील एका शाळेत चौथ्या वर्गात शिक्षण घेत आहेत. ३ एप्रिल रोजी सकाळी मुली शाळेत गेल्या होत्या. त्यावेळी शिक्षक दिलीप जाधव हा अल्पवयीन मुलींच्या अंगावरून



वाईट उद्देशाने हात फिरवल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी संबंधित शिक्षकाविरोधात बोराखेडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, बुलढाणा उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील, ठाणेदार सारंग नवलकार व एप-ीआय राजवंत आठवले यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक राजवंत आठवले व पोलिस कॉन्स्टेबल आकाश यादव करत आहे.

# अज्ञात वाहनाने पायी जाणाऱ्यास चिरडले

**जनसंचलन/ नांदुरा**

पायी जाणाऱ्या एका इसमास अज्ञात वाहनाने धडक दिल्याने तो जागीच ठार झाल्याची घटना नांदुरा ते जळगाव जामोद रोडवरील हॉटेल शिवनेरीसमोर ३ एप्रिल रोजी रात्री १० वाजताच्या दरम्यान घडली. अपघातानंतर घटनास्थळावरून अज्ञात वाहनचालकाने पोबारा केला. हॉटेलमध्ये काम करणारा वीर बहादूर पुनकेसर पून (३५, रा. नेपाळ. ह. मु, सुदर्शन नगर, नांदुरा) हा त्याच्या रूमवर पायी जात होता. त्यास समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने जबर धडक दिली. या अपघ-




ातात त्याचा जागीच मृत्यू झाला. अज्ञात वाहन चालक कोणतीही मदत न करता पळून गेला. या प्रकरणी हॉटेल मॅनेजर नरेशकुमार सबीर राणा (ह.मु., नांदुरा, मुळ रहाणार सीमा जि. जाजलकोट नेपाल) यांनी पोलिसात तक्रार दिली.

# वाऱ्यावर सोडणार नाही, भाऊ म्हणून पाठीशी, एकनाथ शिंदेंची ग्वाही, मात्र भावना गवळी अनुपस्थित

**वृत्तसंस्था/यवतमाळ**

राजकारणात काही समीकरण करावे लागतात. मी कुणालाही वाऱ्यावर सोडणार नाही. बाळासाहेबांचा शिवसैनिक असल्याने दिलेला शब्द पाळणारा आहे. भाऊ म्हणून भावना गवळी यांच्या पाठीशी सदैव राहीन. त्यांचा योग्य सन्मान कायम राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. भावना गवळी मात्र या सभेला अनुपस्थित होत्या. यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या उमेदवार राजश्री पाटील यांचा उमेदवारी अर्ज गुरुवारी दाखल करण्यात आला. यानंतर यवतमाळातील समता मैदानावर झालेल्या सभेत मुख्यमंत्री बोलत होते. व्यासपीठावर खासदार हेमंत पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आमदार अशोक उईके, आमदार नीलय नाईक, आमदार इंद्रनील नाईक, आमदार लखन मलिक, आमदार अर्जुन खोतकर, उमेदवार राजश्री पाटील, वसंत घुईखेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, बाळासाहेबांनी भाजपशी युती केली. काँग्रेसशी कधीही संग करणार करणार नाही असे ते सांगत असत. २०१९ मध्ये बाळासाहेब आणि मोदी यांचा फोटो लावून निवडणुका जिंकल्या. जनतेचा कौलही मिळाला. नंतर बाळासाहेबांचे विचार सोडून काँग्रेसशी आघाडी केली. हे पाहून माझ्यातील शिवसैनिक जागा झाला आणि मी उठाव केला. राज्यात एकाच विचाराचे आणि सर्वसामान्यांचे सरकार आणले, असा दावाही त्यांनी केला.आमचे सरकार येण्यापूर्वी सर्व विकासाची कामे बंद होती. नवे प्रकल्प सुरू होत नव्हते. सण, उत्सवावर अनेक बंधने टाकण्यात आली होती. नागरिकांना मोकळा श्वास घेणे जड होऊ लागले. आमचे सरकार आल्यावर सर्व बंधने दूर केली. बंद पडलेले प्रकल्प पुन्हा सुरू केले. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अनेक योजना सुरू केल्या. बेरोजगारांसाठी नोकऱ्यांची दारे खुली केली. महिलांसाठी अनेक योजना जाहीर केल्या.



त्यामुळे आपला कार्यकर्ता ताठ मानेने लोकांमध्ये जाऊन याची माहिती जनतेला देऊ शकतो, असे शिंदे म्हणाले. राज्यात फेस टू फेस सरकार आहे. घरात बसून सरकार चालविणारे नाही, असेही शिंदे म्हणाले.

# लोकसभा निवडणुकीसाठी एकूण २९ उमेदवारांचे नामांकन...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण २९ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान आज १७ उमेदवारांनी त्यांचे नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडे सादर केले. आज नामांकन अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती. आज बुलडाणा लोकसभा निवडणुकीसाठी ५ जणांनी ५ अर्जाची उचल केली. दरम्यान आज १७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहे. आतापर्यंत ६२ जणांनी १३७ अर्जाची उचल केली होती. यातील २९ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले आहेत. आज गजानन जर्नादन धांडे अपक्ष, नरेंद्र दगडू खेडेकर शिवसेवा उद्धव बाळासाहेब ठाकरे, ज्ञानेश्वर पुरूषोत्तम पाटील अपक्ष, सचिंद्र शेषराव मघाडे सोशालिस्ट पार्टी इंडिया, दिपक भानुदास जाधव पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमॉक्रॅटीक, शाम बन्सीलाल शर्मा अपक्ष, अशोक वामन हिवाळे अपक्ष, नामदेव दगडू राठोड अपक्ष, वसंत राजाराम मगर वंचित बहुजन आघाडी, संतोष भिमराव इंगळे, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर, दिनकर तुमाकार संबारे अपक्ष, विकास प्रकाश नांदवे भिमसेना, बाळासाहेब रामचंद्र इंगळे बहुजन संघर्ष सेना, गौतम किसनराव मघाडे बसपा, विलास शंकर तायडे बहुजन समाज पार्टी, ॲड. सैयद मुबीन सैय्यद नईम अपक्ष, माधवराव सखाराम बनसोडे बहुजन रिपब्लीकन सोशालिस्ट पार्टी या उमेदवारांनी आज नामांकन अर्ज दाखल केले. याआधी संजय रामभाऊ गायकवाड शिवसेना, विजयराज शिंदे भाजप, प्रतापराव जाधव शिवसेना, रविकांत चंद्रदास तूपकर अपक्ष, रेखा कैलास पोफळकर अपक्ष, प्रताप पंढरीनाथ पाटील बहुजन मुक्ती पक्ष, महंमद हसन इनामदार मायनॉरिटी डेमोक्रॅटीक पार्टी,



असलम शहा हसन शहा - महाराष्ट्र विकास आघाडी, सूमन मधुकर तिरपुडे पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटीक, संदीप रामराव शेळके अपक्ष, नंदू जगन्नाथ लवंगे अपक्ष, उद्धव ओंकार आटोळे अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. लोकसभा निवडणुकीची अधिसूचना दि. २८ मार्च रोजी प्रसिद्ध झाली आहे. आज इच्छुकांनी दि. ४ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामांकन अर्ज सादर केले. दाखल करण्यात आलेल्या सर्व २९ नामनिर्देशन पत्रांची शुक्रवारी, दि. ५ एप्रिल रोजी छाननी करण्यात येणार आहे. तसेच दि. ८ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून दि. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

# दगड मारून जखमी करणाऱ्या दोघांना सश्रम कारावास

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

दगड मारून गंभिर जखमी करणाऱ्यां २ आरोपींना सश्रम एक वर्षाची शिक्षा देऊळगाव राजा न्यायालयाने सुनावली आहे. देऊळगाव राजा तालुक्यातील बोरखेडी बावरा येथील फिर्यादी विद्यमान कंकाळ २९ डिसेंबर २०१९ रोजी सिंदखेडराजा पोलीस स्टेशन फिर्याद दिली होती की घटनेच्या दिवशी सायंकाळी ५. ३० वाजता दे राजा ते सि. राजा मार्गांवर वनराई हॉटेल जवळ फिर्यादी व सुनील सुतार हे रोड रुंदीकरणाचे काम करीत होते त्यावेळी आरोपी नामे समाधान विनायक शेरे आणी सुनील परसाराम उजाड मोटार सायकल ने घटनास्थळी येऊन जे सि बी चालक सुनील सुतार यास काम बंद करा असे म्हणून आरोपी सुनील याने जे सिबी ची चाबी हिसकावून घेऊन दोन्ही आरोपींनी सुनील सुतार यास चापटाबुक्क्यांनी मारहाण केली त्यावेळी आरोपी समाधान याने बाजूला पडलेला दगड घेऊन फिर्यादी च्या उजव्या डोळ्याच्या भुवई वर मारून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन सिंदखेड राजा येथे जाऊन आरोपी विरुद्ध तक्रार दिली. यावरून पोलीस स्टेशन सिंदखेड राजा यांनी आरोपी विरुद्ध भा. द. वि. कलम ३२४,३२३,५०४,५०६ सह ३४ प्रमाणे अपराध क्र २६८/२०१९ दाखल केला. सदर गुन्ह्याचा तपास पो. हे. कॉ. अरुण मोहिते यांनी तपास करून आरोपी विरुद्ध वि. न्यायालयात आरोप पत्र दाखल केले. सदर प्रकारणात सरकार पक्षा तर्फ सदर प्रकरणात सहा साक्षीदार तपासले पक्षा तर्फ वि. सहाय्यक सरकारी अभियोक्ता अनिल शेळके यांनी सदर प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्याय निवाडे दाखल करून भरीव युक्तीवाद केला सदर अंतिम युक्तीवाद मा. दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री शैलेश कंठे यांनी ग्राह्य धरून आरोपीस दोषी ठरवून आरोपी समाधान शेरे व सुनील उजाड यांना भा. द. वि. कलम ३२४ मध्ये प्रत्येकी एक वर्ष सश्रम करावास व प्रत्येकी पाच हजार दंडाची शिक्षा सुनावली तसेच भा. द. वि. चे कलम ३२३ मध्ये दोन्ही आरोपींना तीन महिन्याची साध्या कारवासाची कैद व प्रत्येकी एक हजार दंड अशी शिक्षा सुनावली आहे तसेच दंडाची रक्कम न भरल्यास तीन महिने साध्या कारावासाची शिक्षा श्रया दोघांना झाली आहे.सरकारच्या वतीने हे काम सहायक सरकारी वकील अनिल शेळके अध्यक्षस्थानी होते. या कर्नल. सुरेश गवई गो. क्र. ३७६ आणि क्र. पी.ओ. का. जयश्री दांदळे या सर्वांनी हे संपूर्ण कामकाज पाहिले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958